# चंद्रपुर शहर महानगरपालिका, चंद्रपुर

दुरध्वनी क्रमांक -०७१७२ - २५०२२० / २५५६५० ई-मेल आय.डी. - nuhm.chandrapur@gmail.com

क्रमांक :-चंशमनपा/आ.वि./ 968 /२०२६ दिनांक :- 11/05 /२०२६

**आरोग्य सेवा**

## राष्ट्रीय आरोग्य अभियान - १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत मनपा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी महानगरपालिका, चंद्रपूर मार्फत कंत्राटी तत्वावर विविध पदे भरण्याबाबतची जाहीरात

चंद्रपूर शहर महानगरपालिका - मनपा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण संस्था, चंद्रपूर अंतर्गत १५ व्या वित्त आयोगांतर्गत आरोग्य वर्धिनी केंद्रांकरीता (HWC) करीता कंत्राटी पध्दतीने वैद्यकिय अधिकारी MBBS, स्टाफ नर्स (Staff Nurse), बहुद्देशिय कर्मचारी (MPW) या पदांकरीता प्रस्तुत जाहीरातीत नमूद केल्याप्रमाणे पदांची शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वय | प्रवर्गानुसार आरक्षण | एकत्रित मानधन | अर्जासह सादर करावयाचे प्रमाणपत्र / दाखले |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | वैद्यकिय अधिकारी (MBBS) | ०१ | किमान अहर्ता - MBBS महाराष्ट्र मेडिकल काऊन्सिलची नोंदणी आवश्यक. अनुभव असल्यास प्राधान्य. | ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे | इ.मा.व. - १ | रु. ६०,०००/- प्रती माह | १) MBBS पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रिका* २) PG पदवीका प्रमाणपत्र व गुणपत्रिका* ३) महाराष्ट्र मेडिकल काउन्सिल रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्र ४) अनुभव प्रमाणपत्र |
| २ | स्टाफ नर्स (Staff Nurse) | ०३ | १२ वी (सायन्स) पास व जी.एन.एम. कोर्स शासन मान्य संस्थेमधुन उत्तीर्ण अनुभव असल्यास प्राधान्य | ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे | भ.ज. (क) - १ भ.ज. (ड) - १ ई.डब्लु.एस. - १ | रु. २०,०००/- प्रती माह | १) १२ वी उत्तीर्ण प्रमाणपत्र व गुणपत्रिका २) जी.एन.एम. प्रमाणपत्र व गुणपत्रिका* ३) महाराष्ट्र स्टेट नर्सिंग काउन्सिल रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्र ४) अनुभव प्रमाणपत्र |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) | ०८ | १२ वी (सायन्स) पास व पॅरामेडीकल कोर्स किंवा स्वच्छता निरिक्षक कोर्स शासन मान्य संस्थेमधून उत्तीर्ण. अनुभव असल्यास प्राधान्य. | ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे | भ.ज. (क) - १<br>भ.ज. (ड) - १<br>इ.मा.व. - २<br>ई.डब्लु.एस. - १<br>खुला - ३ | रु. १८,०००/- प्रती माह | १) १२ वी उत्तीर्ण प्रमाणपत्र व गुणपत्रिका<br>२) पॅरामेडीकल (एक वर्षाचा) कोर्स किंवा स्वच्छता निरिक्षक कोर्स शासन मान्य संस्थेमधून उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व गुणपत्रिका*<br>३) अनुभव प्रमाणपत्र |

* अंतीम वर्षाची गुणपत्रिका आवश्यक. सदर गुणपत्रिकेनुसार गुण देण्यात येतील.

**अर्जदारांकरीता अटी व शर्ती :**

१) १५ व्या वित्त आयोगांतर्गत आरोग्य वर्धिनी केंद्रांकरीता (HWC) करीता वैद्यकिय अधिकारी MBBS या पदांसाठी भरण्यात येणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड थेट मुलाखत पध्दतीने करण्यात येईल.

२) १५ व्या वित्त आयोगांतर्गत आरोग्य वर्धिनी केंद्रांकरीता (HWC) करीता स्टाफ नर्स (Satff Nurse) व बहुद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) या पदांकरीता भरण्यात येणा-या उमेदवारांची कोणत्याही प्रकारची मुलाखत घेण्यात येणार नसुन, त्यांची निवड गुणांकन पध्दतीनुसार करण्यात येईल.

३) सदरील पदे ही निव्वळ कंत्राटी पध्दतीने केवळ प्रकल्प कालावधीपुरती भरावयाची असून प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील.

४) सदरील पदे ठराविक मासिक मानधनावर असून शासनाच्या धोरणानुसार मानधनात बदल होऊ शकतो.

५) उपरोक्त कंत्राटी पदाची नेमणुक ही २९ जुन, २०२६ पर्यंत राहील. काम समाधानकारक राहील्यास, पुढील कालावधी वाढविण्यासाठी विचार करण्यात येईल.

६) उमेदवाराने कामावर रुजु होण्यापुर्वी रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर विहीत नमून्यात करारनामा (बंधपत्र) करुन द्यावा लागेल.

७) वरील पदांकरीता सर्व शैक्षणिक तसेच इतर प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत सादर कराव्यात. तसेच स्वतः स्वाक्षरी केलेला फोटो अर्जावर चिकटवावा.

८) पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्ज दि. २२/०५/२०२६ ला सायं. ५ वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) महानगरपालिका, चंद्रपूर कार्यालयातील आरोग्य विभागात प्रमाणित दाखल्यांसह (अटेस्टेड करुन) पाठवावे / जमा करणे अनिवार्य राहील. टपालाव्दारे अथवा कुरीअर व्दारे मुदतीबाहय तारखेनंतर प्राप्त होणारे अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

९) उमेदवार चंद्रपूर जिल्हयातील रहिवासी असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

१०) उमेदवारांना शासकिय कर्मचाऱ्यांप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवेचे नियम लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना भविष्यात कायम नोकरीचा दावा करता येणार नाही.

११) निवड झालेल्या उमेदवारांना पुनर्नियुक्ती अंतर्गत पुढील ११ महिने किंवा मा. आयुक्त तथा अध्यक्ष ठरवतील तोपर्यंत नियुक्ती आदेश देय राहील.

१२) जास्त उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यास छाननीअंती एका पदास तिन (१:३) अथवा पाच उमेदवार (१:५) याप्रमाणे पदानुसार पदवी / पदविका इत्यादी शैक्षणिक पात्रतेच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी गुणांचा कट-ऑफ लावण्यात येईल.

१३) प्राप्त अर्जाच्या छाननीअंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रवेश देण्यात येईल.

१४) निवड प्रक्रियेची पध्दत पुढीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| अ) | **थेट मुलाखती :**<br><br>वैद्यकिय अधिकारी (MBBS) | 1) Subject Knowledge (10)<br>2) Research and Academic Knowledge (10)<br>3) Leadership Quality (10)<br>4) Administrative Abilities (10)<br>5) Experience (10)<br>a) For Govt. Experience – 2 marks for 1 year<br>b) For Private Experience – 1 mark for 1 year<br>**TOTAL MARKS - 50** |
| आ) | **गुणांकन पध्दती :**<br><br>स्टाफ नर्स (Staff Nurse) व बहुद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) | १) पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणांच्या आधारे ५० टक्के गुण) - **अधिकतम ५० गुण**<br>२) पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित पदाच्या विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यास, अंतिम वर्षात मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २० टक्के गुण) - **अधिकतम २० गुण**<br>३) संबंधित पदाशी निगडीत फक्त शासकिय / निमशासकिय (Govt./ Semi-Govt.) अनुभव (प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण (१ वर्षाकरीता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) - **अधिकतम ३० गुण**<br>**एकुण १०० गुण** |

१५) पुनर्नियुक्तीबाबत, शासकिय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

१६) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना त्यांना दिलेल्या कार्यक्षेत्रात मुख्यालयी राहून सेवा देणे बंधनकारक राहील.

१७) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचे सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोदवावा. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील, याची दक्षता घ्यावी.

१८) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल, २०१६ चे शासन निर्णयास अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय करीता ४३ वर्षे राहील. तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची सेवाप्रवेश व सेवासमाप्तीची वयोमर्यादा ६५ वर्षे इतकी असून वय ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून प्राप्त केलेले शारिरीकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

१९) भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या उमेदवारांना बोलविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच सदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

२०) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

२१) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल.

२२) ईडब्लुएस (SC/ST/OBC प्रवर्ग वगळता) प्रवर्गाकरीता आवेदन करणा-या उमेदवाराने संपुर्ण कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लक्ष पेक्षा कमी असल्याचे सक्षम अधिका-याकडून प्राप्त केलेले वैध प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

२३) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना-अ या प्रपत्रात अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

२४) उमेदवाराने अधिवास व राष्ट्रीयत्वाचे सक्षम अधिका-यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

२५) वैद्यकिय अधिकारी (MBBS) या पदासाठी सदर जाहिरातीतील रिक्त पदे पुर्ण भरेपर्यंत महिन्याचा तिस-या बुधवारी (सुट्टीचे दिवस सोडून) मा. स्थायी समिती सभागृह, २ रा माळा, चंद्रपुर शहर महानगरपालिका, गांधी चौक, चंद्रपुर येथे अर्ज स्विकारुन त्याच दिवशी थेट मुलाखती घेण्यात येईल.

२६) भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे व आवश्यकतेनुसार पदे घेण्याचे इत्यादी सर्व अधिकार आयुक्त तथा अध्यक्ष निवड समिती (NHM) चंद्रपुर शहर महानगरपालिका, चंद्रपुर यांचेकडे राखुन ठेवले आहे.

**महत्वाची सुचना :** पात्र, अपात्र उमेदवारांची यादी व मुलाखतीचा दिनांक चंद्रपुर मनपाच्या संकेतस्थळावर तसेच, आरोग्य विभाग, तिसरा माळा, महानगरपालिका चंद्रपुर येथे उपलब्ध होण्याचा

दिनांक : ०५/ ०६ /२०२६.

(मुलाखती करीता / निवड झालेल्या उमेदवारांना या कार्यालयामार्फत कुठल्याही प्रकारचे भ्रमणध्वनी व्दारे संपर्क करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.)

**(अकुनुरी नरेश, भा.प्र.से.)**
**आयुक्त,**
**चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर**

**कार्यालय महानगरपालिका चंद्रपूर ...................... या पदाकरिता अर्ज**

| |
|---|
| अर्जदाराने स्वाक्षरीसहीत फोटो चिकटवावा. |

प्रति,

**मा. आयुक्त,**
**महानगरपालिका, चंद्रपूर**

संदर्भ :- दैनिक वृत्तपत्र .................................. दिनांक ..................... मधील जाहिरात.

**महोदय,**

जाहिरातीनुसार, मी .................................. पदाकरिता अर्ज करीत असून माझा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१) संपूर्ण नांव : ..................................................................

२) पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह) : ..................................................................

३) दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल : ..................................................................

४) जन्मतारिख : अंकात ................ अक्षरात .................................. दिनांक ................ रोजीचे वय............ वर्षे.

५) आरक्षण प्रवर्ग (आवश्यक प्रमाणपत्र जोडावे) ..............................................

६) उन्नत/प्रगत गटात मोडता काय होय/नाही

७) महाराष्ट्राचा मूळ रहिवाशी आहे काय होय/नाही

८) विवाहित/अविवाहीत ..........................

९) विवाहित असल्यास लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे काय होय/नाही
(आवश्यक प्रमाणपत्र जोडावे)

**१०) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता**

| अ. क्र | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | परिक्षा मंडळाचे/ विद्यापिठाचे नांव | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

संगणक परीक्षा उत्तीर्ण (एमएससीआयटी) ................. टक्केवारी.

११) अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राची यादी (सांक्षाकिंत प्रती जोडाव्यात)

| | |
|---|---|
| १) | ५) |
| २) | ६) |
| ३) | ७) |
| ४) | ८) |

दिनांक :

ठिकाण:

अर्जदाराची स्वाक्षरी

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ

## प्रतिज्ञापत्र

## (नियम-४ पाहा)

श्री/श्रीमती/कुमारी.........................................श्री..................................................

यांचा/यांची मुलगा/मुलगी/ पत्नीं, वय ............ वर्षे, राहणार..................................................

याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी...................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ............. (संख्या) इतकी हयात मुले आहेत त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या.......... आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.) .....................

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण:

अर्जदाराची स्वाक्षरी

## प्रतिज्ञापत्र

मी याव्दारे शपथपूर्वक कथन करतो/करते की, अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या महितीनुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेतून अपात्र घोषित केले जाईल आणि जर निवड/नेमणुक झाल्यास माझी सेवा कोणतीही पुर्वसूचना दिल्याविना समाप्त केल्या जाईल याची मला जाणीव आहे.

मी याव्दारे कथन करतो/करते की, मला शासकीय सेवेकरिता अपात्र घोषित कलेले नाही, मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही व माझ्याविरुध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित नाही.

दिनांक :

ठिकाण:

अर्जदाराची स्वाक्षरी

(नाव व पत्ता)